**Review Of Research**
**ISSN 2249-894X**

**Impact Factor : 3.1402(UIF)**
**Volume - 5 | Issue - 1 | Oct - 2015**

# होळकर आणि ढमढेरे सरदार

**डॉ. पद्माकर ज्ञानोबा गोरे**
**साहेबराव शंकरराव ढमढेरे महाविद्यालय तळेगाव ढमढेरे, ता. शिरूर, जि. पुणे.**



मराठे व मोगल स्वातंत्र्ययुध्दाच्या (१६८२ ते १७०७) उत्तरार्धात मराठयांनी आक्रमक धोरणाचा अंगीकार करून औरंगजेबाच्या वर्चस्वाखालील प्रदेशावर स्वा-या करण्यास सुरूवात केली होती. औरंगजेबाच्या हयातीत नेमाजी शिंदे आणि खंडेराव दाभाडे यांनी माळव्यावर स्वा-या करण्याचा प्रयत्न सुरू केला होता. छत्रपती शाहू महाराजांनी मराठा राज्याची सत्तासूत्रे हाती आल्यानंतर मराठी सत्तेच्या विस्तारावर भर दिला. औरंगजेबाच्या मृत्यूनंतर मोगल सत्तेमध्ये निर्माण झालेल्या अनागोंदीचा फायदा घेण्याचे ठरवून मराठी सत्तेचा उत्तर भारतात विस्तार करण्यावर त्यांनी भर दिला. इ. स. १७१९ मध्ये बाळाजी विश्वनाथाने माळवा मार्गानेच दिल्लीवर स्वारी केली होती. परंतु मराठयांचा माळव्यातील हा प्रवेश नाममात्रच होता.

पहिले बाजीराव पेशवे यांनी मल्हारराव होळकर, राणोजी शिंदे, उदाजी पवार यांना आपल्या बरोबर घेऊन इ. स. १७२२ व इ. स. १७२४ मध्ये माळव्यावर महत्वकांक्षी स्वा-या केल्या. माळव्याचे सुभेदार गिरीध बहादर व दया बहादर यांच्यावर आक्रमण करून अमझेरा येथे चिमाजी अप्पाने त्यांचा वध केला व माळवा पहिल्यांदाच मराठी साम्राज्यात सामील करून घेतला. माळवा ताब्यात आल्यानंतर बाजीराव पेशवेंनी मल्हारराव होळकर यांना इंदोरमध्ये, राणोजी शिंदे यांना उज्जैनमध्ये व उदाजी पवारांना धार मध्ये प्रस्थापती करून माळव्याची वाटणी या तिघांमध्ये करून दिली. माळव्याच्या एकूण प्रदेशापैकी ३०% होळकर, ३०% शिंदे आणि ९% पवारांकडे व ३१% पेशवेंकडे अशी वाटणी करून दिली.

मराठी सत्तेचा उत्तर भारतामध्ये दबदबा निर्माण करणा-या सरदारांमध्ये मल्हारराव होळकर यांचा समावेश होतो. मराठी सत्तेच्या उत्तर भारतातील सत्ता विस्तारामध्ये मल्हारराव होळकरांनी महत्वपूर्ण कामगिरी बजावली होती. इ. स. १६९३ मध्ये त्यांचा जन्म झाला होता. खानदेशातील कदमबांडे सरदारांच्या लष्करात मल्हारराव होळकरांनी एक शिपाई म्हणून नोकरी स्वीकारली होती. गनिमी काव्याने लढा देण्यात मल्हारराव होळकर तरबेज होते. बाळाजी विश्वनाथाच्या दिल्ली मोहिमेत मल्हारराव होळकरांचे कर्तृत्व पहिल्या बाजीरावांच्या लक्षात आले. पहिले बाजीराव पेशवे यांनी इ. स. १७२१ मध्ये मल्हारराव होळकरास कदमबांडे यांच्याकडून आपणाकडे मागवून घेतले.[1] आपल्या कर्तृत्वाच्या जोरावर पहिले बाजीराव पेशवे यांच्या विश्वासातील एक सरदार म्हणून मल्हारराव होळकर ओळखले जाऊ लागले. इ. स. १७३५ मध्ये माळव्याच्या मोहिमेत त्यांनी पराक्रम गाजवला. त्यांच्या पराक्रमावर खूष होऊन पहिले बाजीराव पेशवे यांनी त्यांना इंदोर प्रांताचा सरंजाम दिला. इ. स. १७४५ पर्यंत मल्हारराव होळकरांच्या ताब्यात साडे चौ-याहत्तर लक्षाचा मुलूख होता. उत्तर भारतात मराठी सत्तेचे साम्राज्यात रूपांतर करण्यात मल्हारराव होळकरांचे कर्तृत्व कारणीभूत ठरले होते.

मल्हारराव होळकरांच्या दिमतीला बाजीराव पेशवेंनी आपले अनेक विश्वासू पराक्रमी सरदार नेमूण दिले होते. या सरदामध्ये तळेगाव ढमढेरे गावातील ढमढेरे सरदारांचा समावेश होतो. मल्हारराव होळकर

यांच्या पदरी मकाजी ढमढेरे, खंडोजी ढमढेरे, भुलोजी ढमढेरे, अमृतराव ढमढेरे, पिराजी ढमढेरे ही ढमढेरे मंडळी नेमूण दिली होती. खंडोजी ढमढेरे यांना बुढाची सुभेदारी असून त्यांच्याकडे १००००/- रूपयांचा महसुलाचा प्रदेश नेमुण दिला होता.[2] पिराजी ढमढेरे हे चांदवड किल्याचे किल्लेदार होते. इ. स. १७५२ – ५३ मध्ये मल्हारराव होळकरांच्या ताब्यातील चांदवड किल्यावर किल्लेदार म्हणून कार्यरत असणा-या पिराजी ढमढेरे यांना पाठवलेल्या आज्ञापत्रात मल्हारराव होळकर म्हणतात राजश्री अप्पाजीराव यांना चांदवड किल्याच्या कारखानिशीचे काम सांगून पाठविले आहे. त्यांना ६०० रू. वार्षिक नेमणूक केली आहे. या पत्रावर मल्हारराव होळकरांचा शिक्का आहे.[3]

इ. स. १७६८ – ६९ मध्ये राजजी ढमढेरे तुकोजी होळकरांच्या पदरी होते. इ. स. १७७६ – ७७ मध्ये मंडोजी ढमढेरे यांच्याकडे होळकरांच्या ताब्यातील खादेश प्रांतातील परगणे आव्होर व परगणे आडावद हे दोन परगणे सरंजाम म्हणून होते. त्यांच्या दिमतीला १०० स्वारांचे पथक होते. तुकोजी होळकर यांनी मंडोजी ढमढेरे यांना हे दोन परगणे सरंजामास जहागीर देऊन १०० स्वारांची सरदारी दिल्याची सनद दिली होती.[4] तुकोजी होळकरांच्या दिमतीस असलेल्या ढमढेरे सरदारांकडे परगणे अंबर मधील ४००००/- रूपयांची जहागिर व परगणे अडावद मधील ६००००/- रूपयांची जाहागिर आणि उमौजे दही या परगण्यातील ६००००/- रूपयांची जहागिरी अशी एकूण १६००००/- रूपयांची जहागीरी होती.[5]

मल्हारराव होळकर मराठेशाहीतील एक बलाढय सरदार म्हणून प्रसिध्द आहेत. मराठी राज्याचा उत्तर भारतात विस्तार करून स्वराज्याचे साम्राज्यात रूपांतर करण्यात त्यांनी महत्वाचे योगदान दिले. उत्तर भारतातील मराठी सत्तेचा डोलारा सांभळणा-या प्रमुख सरदारांमध्ये त्यांचा समावेश होता. त्यांच्या नेतृत्वाखाली व मार्गदर्शनाखाली तळेगाव ढमढेरे गावातील मकाजी ढमढेरे, खंडोजी ढमढेरे, भुलोजी ढमढेरे, अमृतराव ढमढेरे, पिराजी ढमढेरे हे ढमढेरे सरदार कर्तृत्व गाजवत होते. मराठी सत्तेचा उत्तर भारतात दबदबा व दरारा निर्माण करण्यात मल्हारराव होळकरांना ढमढेरे सरदारांची महत्वपूर्ण मदत झाली होती. ढमढेरे सरदारांच्या कर्तृत्वावर खूष होउनच मल्हारराव होळकरांनी खंडोजी ढमढेरे यांना बुढाची सुभेदारी दिली होती. चांदवड किल्यासारख्या महत्वाच्या किल्याचे किल्लेदार म्हणून पिराजी ढमढेरेंची नियुक्ती त्यांनी केली होती. छत्रपती शिवाजी महाराज आपल्या अत्यंत विश्वासातील शूर व्यक्तींची नियुक्ती किल्लेदार म्हणून करत असत. छत्रतींचा हाच वारसा पुढे मल्हारराव होळकरांनी चालू ठेवला होता. पिराजी ढमढेरे मल्हारराव होळकरांच्या अत्यंत विश्वासातील शूर सरदार असल्यामुळे चांदवड किल्याचे किल्लेदार ही महत्वाची व जोखमीची जबाबदारी पिराजी ढमढेरेंकडे दिली होती.

मंडोजी ढमढेरे यांची कर्तबगारी पाहूनच होळकरांनी खादेश प्रांतातील परगणे आव्होर व परगणे आडावद हे दोन परगणे सरंजाम म्हणून देऊन त्यांच्या दिमतीला १०० स्वारांचे पथक दिले होते. तुकोजी होळकरांच्या दिमतीस असलेल्या ढमढेरे सरदारांकडे एकूण १६००००/- रूपयांची जहागीरी होती. तत्कालीन परिस्थितीमध्ये अशा प्रकारची जहागिरी युध्दभूमीमध्ये पराक्रम गाजवून सत्ताविस्तार करणा-या पराक्रमी सरदारांना त्यांच्या कार्याचा गौरव करण्यासाठी आणि त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी दिली जात होती. तुकोजी होळकरांनी ढमढेरे सरदारांच्या कर्तृत्वावर खूष होऊनच १६००००/- रूपयांची जहागीरी त्यांना दिली होती. एकूणच मल्हारराव होळकर व तुकोजी होळकर यांच्या नेतृत्वाखाली तळेगाव ढमढेरे गावातील ढमढेरे सरदारांनी मराठी सत्तेच्या विस्तारात योगदान दिले.

## * संदर्भ आणि तळटिपा *

१. गो. स. सरदेसाई, **मराठी रियासत खंड ३ पुण्यश्लोक शाहू पेशवा बाळाजी विश्वनाथ पेशवा बाजीराव**, मुंबई, २०११, पृ. ३२४.

२. अ. रा. कुलकर्णी, ग. ह. खरे (संपा.), **मराठयांचा इतिहास खंड तिसरा**, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, २००६, पृ. ४३७.

३. वा. रा. ठाकूर (संपा.), **होळकरशाहीच्या इतिहासाची साधने भाग १**, गव्हर्मेंट प्रेस, इंदोर, १९४४, पत्र क्र. ९८, पृ. २१७.)

४. **पुणे पुराभिलेखागार, पुणे जमाव,** रूमाल नं. १६६४.

५. वा. रा. ठाकूर (संपा.), **होळकरशाहीच्या इतिहासाची साधने भाग १**, पूर्वोक्त, पत्र क्र. ९८, पृ. २१७.